निर्णय क्र. मविनिआ/माअअ/अपील/०५/२०१५/ ००५१ दिनांक- ०७.०४.२०१५

अपील क्र. मविनिआ/माअअ/अपील/०५/२०१५

**अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे:**

अपीलकर्ता

श्री. धोंडीराम वसंत पाटील,
पोस्ट बॉक्स नं- ११७,
प्लॉट नं.३ आणि १०,स्टेशन रोड,
इंडस्ट्रीयल इस्टेट,
इचलकरंजी - ४१६ ११५.

| | | |
|---|---|---|
| माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | : | १४.०१.२०१४ |
| जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याची तारीख | : | ०३.०२.२०१५ |
| प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | : | १२.०३.२०१५ |

**मागितलेली माहिती :**

१. Detailed Stake holders comments on the draft Distribution open Access Regulation २०१३
   १. Name of Stake holders
   २. Their comments/ suggestions against regulation ३.१ Eligibility, ४.२ Contract demand reduction and २६.८ Scheduling.
२. Details of Discoms comments on the draft DOA २०१३
   १. Name of Stake holders
   २. Their comments/ suggestions against regulation ३.१ Eligibility, ४.२ Contract demand reduction and २६.८ Scheduling.
३. Notice of press release inviting stake holders comments/suggestion on correction Draft DOA after stake holder and discom suggestions in ३.१,४.२ and २६.८.
४. Notice and date of public hearing held before finalization of Draft DOA Regulation २०१४.
५. Name of Participants, their comments / suggestions pertaining to public hearing of DOA २०१४.


१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Colaba, Mumbai - 400 005.
**Tel.:** 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 **Fax :** 022-2216 3976
**E-mail :** mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in **Website :** www.merc.gov.in / www.mercindia.org.in

६. Whether final (amended) draft had put for information of public before publishing it into Gazette, if so provide details of the same.

**जन माहिती अधिकारी यांचे उत्तर:**

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्र. मविनिआ/माअअ/०५/२०१५/०१५४९ दि.०३.०२.२०१५ नुसार अपिलार्थी यांना दिलेली माहिती येणे प्रमाणे -

आपणांस आवश्यक असलेली माहिती आयोगाच्या कार्यालयात उपलब्ध असून सदर माहिती आपणांस पुरविणेसाठी माहितीचा अधिकार (फी आणि खर्च विनियम), नियम, २००५ चे कलम ४ मधील खंड (अ) नुसार खालीलप्रमाणे शुल्क आकारणी करण्यात येत आहे.

| मागणी केलेली माहितीची एकूण पृष्ठ | प्रती पृष्ठ शुल्क रु. | एकुण माहिती शुल्क रु. | टपाल खर्च रु. (माहिती अर्जदार स्वत: घेऊन जाणार असल्यास टपाल खर्च आवश्यक नाही.) | एकुण रु. |
|---|---|---|---|---|
| १०३९ | २ | २०७८ | अंदाजे रु.५०० | २५७८/- |
|  |  |  | एकुण रु. | २५७८/- |

वरील प्रमाणे आकारलेले शुल्क (फी) आपण महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई या नावाने धनाकर्ष अथवा कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष रोख रक्कम जमा करुन शुल्क भरल्याची पावती /चलन पुरावा सत्य प्रत या कार्यालयात समक्ष सादर करुन आपणांस हव्या असलेल्या प्रती उपलब्ध करुन घ्यावेत.

**प्रथम अपील दाखल करण्याचे कारण-**

जनमाहिती अधिकारी यांनी नेमकी, अचूक व पूर्ण माहिती पुरविलेली नाही, अर्जदारास दिशाभुल करणारी अपुरी व अनावश्यक माहिती देवुन अयोग्य कागदपत्रांची रक्कम वसुल केली आहे. त्याबददल अधिक पत्रव्यवहार केला असता काहीही उत्तर देण्यात आलेले नाही.

**आदेश (माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम १९ अंतर्गत)-**

मागितलेली माहिती वरिल नमूद केलेल्या कारणांकरिता अपीलकर्ता यांनी अपील दाखल केले आहे.

संबंधित अर्जावर आयोगाच्या कार्यालयामध्ये दि. ३१.०३.२०१५ रोजी दुपारी सुनावणी ठेवण्यात आली होती. सदर सुनावणीत जन माहिती अधिकारी यांनी आपले निवेदन सादर केले. अपिलार्थी यांना पाठवलेली सुनावणीची नोटीस अपुरा पत्ता या सबबीने परत आलेली आहे. अपिलार्थी यांनी त्यांचा भ्रमन्धवनि क्रमाक दिलेला नाही. त्यामुळे त्यांना संपर्क साधता आला नाही. सदर सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर होते.

माहिती अधिकाराच्या अर्जावरुन प्रथमदर्शनी असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती अधिकारी यांनी उपलब्द असलेली माहिती पुरवलेली आहे. करिता अपील निकाली काढण्यात येत आहे.

जर प्रथम अपीलीय अधिका-यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२ येथे अपील दाखल करू शकता.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(अनिलकुमार उके)
उपसंचालक (विधी) तथा
प्रथम अपीलीय अधिकारी.

प्रत- जनमाहिती अधिकारी, मविनिआ, यांना माहितीसाठी.